**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्था, ठाणे.**

**इंडियन नर्सिंग कौन्सिल व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल मान्यता प्राप्त संस्था**

**प्रवेश सुचना २०१८-२०१९**

०१ ऑगस्ट २०१८ पासून सुरु होणाऱ्या ३ वर्षे कालावधीच्या जनरल नर्सिंग व मिडवायफरी प्रशिक्षणाकरिता फक्त स्त्री उमेदवारांकडून पुढील अटी शर्तीनुसार विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.

१. **शैक्षणिक अर्हता :-** महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची १२ वी (१०+२) परीक्षा कमीतकमी ४०% गुण मिळवून उत्तीर्ण झालेली असावी. विज्ञान शाखेच्या (पी.सी.बी. ग्रुप विषयासह) उमेदवारांना प्राधान्य असेल परंतु विज्ञान शाखेचे पुरेसे उमेदवार उपलब्ध न झाल्यास वाणिज्य व कला शाखेच्या उमेदवारांना गुणवत्तेनुसार प्राधान्य दिले जाईल. १२वी (१०+२) परीक्षेत सर्व विषयात मिळालेल्या एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांची निवड केली जाईल.

२. **वयोमर्यादा :-** उमेदवाराचे वय दिनांक ३१.१२.२०१८ रोजी १७ वर्षे पूर्ण व जास्तीत जास्त ३५ वर्षा पर्यंत असावे.

३. **प्रवेशासाठी एकूण जागा :-** तीस (३०) मागासवर्गीय उमेदवारांसाठी महाराष्ट्र राज्य शासन नियमानुसार जागा राखीव.

४. **पात्रता:-** एकूण प्रवेश क्षमतेच्या ५०% जागा ठाणे महानगरपालिका क्षेत्र व ५०% जागा ठाणे व पालघर जिल्हाक्षेत्रामध्ये कमीत कमी १५ वर्षे रहिवास असलेल्या उमेदवारांसाठी उपलब्ध असतील ठाणे महानगरपालिका हददीतून राखीव जागांवर योग्य प्रमाणात राखीव प्रवर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्यास ठाणे व पालघर जिल्हयातील पात्र उमेदवारांचा त्या जागांसाठी विचार केला जाईल. तसेच उमेदवार १० वी ची परीक्षा ठाणे महानगरपालिका व ठाणे व पालघर जिल्हा हददीतील शासन मान्य संस्थेतून उत्तीर्ण असणे बंधनकारक आहे.

५. **प्रवेश अर्ज शुल्क :-** खुल्या वर्गासाठी रु.१००/- व राखीव उमेदवारांसाठी रु. ५०/- आहे.विहीत नमुन्यातील अर्ज मिळविण्यासाठी प्राचार्या यांच्या नांवे लेखी अर्ज करुन सोबत शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र अथवा शाळेकडून प्राप्त झालेले बोनाफाईड सर्टीफिकेट, १२ वी ची गुणपत्रिकेची प्रत व स्थानिक वास्तव्याचा दाखला किंवा रेशनकार्डची प्रत व राखीव उमेदवारांनी कार्यकारी दंडाधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या जातीच्या प्रमाणपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे

६. **प्रवेशप्रक्रिया :**

**प्रवेश अर्ज मिळण्याचे ठिकाण** : सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्था, बी विंग
राजीव गांधी वैदयकीय महाविदयालय हॉस्टेल
बिल्डींग,हंसनगर खोपट, ठाणे (प).

**प्रवेश अर्ज वितरण** : १८.६.२०१८ किंवा जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून दि. २८.०६.२०१८.

**प्रवेश अर्ज स्वीकृतीचा दिनांक** : १८.०६.२०१८ पासून ३०.६.२०१८

**प्रवेश अर्ज मिळण्याची व स्वीकृतीची वेळ :** सकाळी १०.३० ते संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत (शासकीय सुटटीचे दिवस सोडून)

**प्रारुप गुणवत्ता यादी प्रसारण** : दि. १०.०७.२०१८ दुपारी २.०० वाजता संस्थेच्या आवारात प्रसिध्द केली जाईल.

**प्रारुप गुणवत्ता यादी विषयी लेखी आक्षेप स्वीकृती दिनांक** : दि.११.०७.२०१८ दुपारी २.०० वाजेपर्यंत

**अंतीम गुणवत्ता यादी प्रसारण** : दि. १२.०७.२०१८ संध्याकाळी ४.०० वाजता

**प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक** : दि.१६.०७.२०१८ सकाळी ८.०० वाजल्यापासुन मुलाखतीच्या वेळी अर्जासोबत जोडलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती (ओरिजनल्स) सादर करणे आवश्यक आहे. मुलाखतीस हजर राहण्यासाठी प्रवासखर्च दिला जाणार नाही. तसेच मुलाखती संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणर नाही व दूरध्वनीद्वारे माहिती दिली जाणार नाही तसेच सकाळी ११.०० वाजेपर्यंत हजर असलेल्याच उमेदवारांचाच विचार केला जाईल.

**निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसारण :** दि.२६.०७.२०१८ दुपारी २.०० वाजता संस्थेच्या आवारात प्रसिध्द केली जाईल.

निवड झालेल्या उमेदवारांनी दि. ३१.०७.२०१८ संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. प्रतिक्षायादी नुसार पुढील प्रवेश देण्यास दि. १.०८.२०१८ रोजी दुपारी ४.०० वाजता सुरु केले जाईल.

**सही /-**
**मा.अधिष्ठाता**
**राजीव गांधी वैदयकीय महाविदयालय**
**तथा छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय.**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**Pls. visit our official website**
**www.thanecity.gov.in**